सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या साखर कारखान्यांस ऊस पुरविण्याऱ्या शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदान देण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : ससाका २०१८/प्र.क्र.१३०/(भाग-२)/३स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८ मार्च, २०२५.

संदर्भ: १. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक ससाका २०१५/प्र.क्र.२२६/३-स दि. ३०.०७.२०१५.
२. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक ससाका २०१५/प्र.क्र.२२६अ/३-स दि. ०५.०९.२०१५.
३. शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक शिकाना/ससाका २०१५/प्र.क्र.३८५/३-स दि. ०९.१२.२०१५.
४.साखर आयुक्त, पूणे यांचे पत्र क्र.साआ/अर्थ/कक्ष-६/सॉफ्ट लोन/एकत्रीतमागणीप्र./४३०/२०२३ , दि.३०.०३.२०२३.
५. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. ससाका २०१८/प्र.क्र.१३०/ (भाग-२)३स, दि. १५.१०.२०२४.
६.साखर आयुक्त, पूणे यांचे पत्र क्र.साआ/अर्थ/कक्ष-६/सॉफ्ट लोन प्रस्ताव/१८५८/२०२४, दि.१३.१२.२०२४.

प्रस्तावना:

सन २०१४-१५ च्या गाळप हंगामात कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना ऊसासाठी एफआरपीची रक्कम देण्याकरिता मदत व्हावी म्हणून, केंद्र शासनाने दि. २३ जून, २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सॉफ्ट लोन योजना जाहीर केली. सदर योजनेस अनुलक्षून गाळप हंगाम २०१४-१५ मधील एफ. आर. पी. प्रमाणे एकूण देय ऊस किंमतीच्या ५० टक्के रक्कम दि. ३० जून, २०१५ अखेर ज्या कारखान्यांनी अदा केलेली आहे व ज्या कारखान्यांनी हंगाम २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये गाळप घेतले आहे, अशा राज्यातील १४८ पात्र सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना केंद्र शासनाने जाहीर केलेली योजना लागू करण्याबाबत तसेच प्रथम वर्षाच्या कर्जावरील सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकांकडून आकारण्यात येणारे व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार प्रथम वर्षाचे व्याज अनुदान केंद्र शासनाने दिल्यावर उर्वरीत कर्जावरील रेड्युसिंग बॅलन्सनुसार पुढील ४ वर्षाचे व्याज अनुदान राज्य शासन देईल असा निर्णय संदर्भ क्र. १ दि.३०.०७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

तद्नंतर फक्त सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या २२ सहकारी व खाजगी साखर कारखान्यांसाठी राज्य शासनामार्फत व्याज अनुदानाबाबत संदर्भ क्र. २ येथील दि.०५.०९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला. सदर दोन्ही योजनांत न बसणाऱ्या ६ सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन-व्याज अनुदान योजना संदर्भ क्र. ३ येथील दि.०९.१२.२०१५ शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली.

त्यानुसार राज्य शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून पात्र असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना वेळोवेळी अनुदान वितरित करण्यात आले आहे.

सदर योजनेकरिता सन २०२४ मध्ये संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये रु. १४.५४ कोटी इतकी रक्कम दीर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदानासाठी प्रदान करण्यास मान्यता दिलेली आहे. आता, साखर आयुक्त यांनी संदर्भ क्र. ६ येथील दि.२८.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केलेल्या २६ साखर कारखान्यांना व्याज अनुदानाची सन २०१७-१८, सन २०१८-१९, सन २०१९-२० व सन २०२०-२१ या चार वर्षाची रक्कम अदा करण्यासाठी सन २०२४-२५ मध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पित तरतूदीमधून रु.१०८.३० लाख (रुपये एक कोटी आठ लाख तीस हजार फक्त) इतका निधी दिर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदान म्हणून उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सॉफ्ट लोन २०१५ योजनेंतर्गत वर्ष २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ करिता सोबत जोडलेल्या परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केलेल्या कारखान्यांना त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ७ मध्ये दर्शविल्यानुसार **एकूण रु.१०८.३० लाख** (रुपये एक कोटी आठ लाख तीस हजार फक्त) व्याज अनुदानाचा निधी उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन राहून वितरित करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम "मागणी क्रमांक-व्ही-२, २४२५ सहकार, १०८ इतर सहकारी संस्थांना सहाय्य, (०३) सहकारी साखर कारखाने, (०३) (०२) सहकारी साखर कारखान्यांना सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४२५ ०९८९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. सदर खर्च सन २०२४-२५ करीता मंजूर झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. तसेच, ज्या सहकारी साखर कारखान्यांकडे शासकीय रक्कमांची थकबाकी आहे अश्या थकीत रक्कमांची वसूली सदर मंजूर होणाऱ्या सॉफ्ट लोन अनुदानातून करण्यात यावी. यासाठी सदर रक्कमा सॉफ्ट लोन लेखाशिर्ष २४२५ ०९८९ मधून काढून खालील लेखाशिर्षात जमा/समायोजित करण्यात याव्यात.

अ. शासकीय कर्ज - लेखाशिर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे (वसूली) १०८- इतर सहकारी संस्थांना कर्जे - सहकारी साखर कारखान्यांना कर्जे (००) (०६) (६४२५ ५१९१).

ब. हमी शुल्क - लेखाशिर्ष - ८२३५ - सर्वसाधारण व इतर राखीव निधी ००, ११७, हमी विमोचन निधी (००) (०१) हमी विमोचन निधी (८२३५ ५०४५).

क. व्याज - लेखाशिर्ष ००४९ - व्याजाच्या जमा रकमा १९५ सहकारी संस्थांकडून व्याज, सहकारी साखर कारखाने (०१) (०९) (००४९ १२०१).

उपरोक्त लेखाशिर्षांस नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक. २६/का-१४३१ दि.१६.०३.२०२३ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक.२२८/व्यय-२, दि.३०.०३.२०२३ अन्वये सहमती दर्शविलेली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे त्यानुसार लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी त्या-त्या साखर कारखान्यांच्या बँकेला व्याज अनुदानाबाबत, निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अनुषंगाने निधी वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. “आहरण व संवितरण अधिकारी" व “ नियंत्रण अधिकारी" यांनी सदर तरतुद वितरीत करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनयिग भाग-२ दिनांक १७.०४.२०१५ व वित्त विभाग परिपत्रक,

क्रमांक: अर्थसं- २०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि.२५.०७.२०२४ मधील अटी व शर्तीचे तसेच वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

६. सदरहू शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१३९/का.१४३१ दि. १७.०३.२०२५ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.२३४/२०२५/व्यय-२ दि. २२.०३.२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून व त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०३२८१७५२०७१६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH
PANDURANG
SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=0619305c0a0825664efa457ffa51c3f2364841c81f8c4370
78a333b7111446a2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D
173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG
SHINGADE
Date: 2025.03.28 17:53:10 +05'30'

(अंकुश पां.शिंगाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (३ प्रती)
२. प्रधान महालेखापरिक्षक, लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
५. महालेखापाल -१, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) मुंबई.
६. महालेखापाल -२, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) नागपूर.
७. संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९. लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे (३ प्रती)
१०. सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
११. सर्व लेखापरीक्षक (साखर)
१२. वित्त विभाग (व्यय-२), कराधान-३ व अर्थसंकल्प-१२, (अर्थोपाय शाखा), मंत्रालय, मुंबई.
१३. नियोजन विभाग कार्यासन १४३१, मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन क्रमांक १६-स/१७-स/२२-स/२५-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सह संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई.
१६. कक्ष अधिकारी, १६-स तथा वेब को-ऑर्डिनेटर, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती (३-स).

शासन निर्णय क्रमांक : ससाका २०१८/प्र.क्र.१३०/(भाग-२)/३स,दि.२८ मार्च, २०२५.

						रु.लाखात
सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन देय व्याज अनुदान मागणी, वितरीत व देय रक्कम तपशील						
परिशिष्ट- अ						
अ. क्र.	जिल्हा	कारखान्याचे नांव	या योजनेअंतर्गत एकत्रीत मागणी रक्कम रु.	३१.०३.२०२४ अखेर ससाकांना वितरीत रक्कम	सॉप्ट लोन योजने अंतगत देय रक्कम	सन २४-२५ मधील तरतुदीनुसार वितरीत करावयाची रक्कम
१	२	३	४	५		
१	अहमदनगर	सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि.अमृतनगर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर	४५४.९०	४५४.८९	०.०१	०.०१
२	अहमदनगर	सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लि.सहजानंद नगर, पो. शिंगणापूर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर (शा. नि. दि. २१.४.२०१६ कच्ची साखर)कर्ज रक्कम रु.१०५३.०० लाख ५ वर्षे	२१०.६०	१९५.२०	१५.४०	१५.४०
३	अहमदनगर	सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लि.सहजानंद नगर, पो. शिंगणापूर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर (शा. नि. ३०.७.२०१५ व्हाईट शुगर) रक्कम रु.८०५.०० ४ वर्षे	१७३.३२	१७३.३१	०.०१	०.०१
४	अहमदनगर	मुळा सहकारी साखर कारखाना लि. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर	३७४.८३	३७४.८२	०.०१	०.०१
५	बीड	लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि. सुंदरनगर, ता. धारूर, जि. बीड (शा. नि. दि. २१.४.२०१६ कच्ची साखर) ५ वर्षे	३१९.४०	३१९.४०	०.०१	०.०१
६	कोल्हापूर	दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री (मौनिनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर	४१३.६२	४१३.६१	०.०१	०.०१

७	कोल्हापूर	शरद सहकारी साखर कारखाना लि., शामराव पाटील नगर, नरंदे, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर	४०८.२१	४०८.२०	०.०१	०.०१
८	कोल्हापूर	जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.हुपरी-यलगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर(बँक ऑफ इंडिया)	७२४.०३	७२४.०२	०.०१	०.०१
९	कोल्हापूर	श्री. छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि. कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर	५००.५३	५००.५२	०.०१	०.०१
१०	कोल्हापूर	श्री तात्यासाहेब कोरे वारणा ससाका लि., वारणानगर, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर (पांढरी साखर) बँक ऑफ इंडिया	४३६.२३	४३६.२२	०.०१	०.०१
११	कोल्हापूर	श्री तात्यासाहेब कोरे वारणा ससाका लि., वारणानगर, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर (पांढरी साखर) बँक ऑफ बडोदा .	३७३.६२	३७३.६१	०.०१	०.०१
१२	कोल्हापूर	श्री दत्त शेतकरी ससाका लि.,शिरोळ,ता. शिरोळ, जि.कोल्हापूर	७०७.७१	७०७.७१	०.०१	०.०१
१३	कोल्हापूर	कुंभी कासारी ससाका लि., कुडित्रे, ता. करवीर, जि.कोल्हपूर	३६७.९८	३६७.९७	०.०१	०.०१
१४	सांगली	पद्मश्री क्रांतीवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. नागनाथअण्णानगर, वाळवे, ता.वाळवा, जि. सांगली	४५१.५२	४५१.५१	०.०१	०.०१
१५	सांगली	क्रांतीअग्रणी डॉ. जी.डी.लाड सहकारी साखर कारखाना लि.कुंडल, ता. पलुस, जि. सांगली	५०५.३४	५०५.३३	०.०१	०.०१
१६	हिंगोली	पुर्णा ससाका लि. युनिट -१ (बाराशिव हनुमान ससाका) जि. हिंगोली	२४३.०५	२४३.०४	०.०१	०.०१
१७	हिंगोली	पुर्णा ससाका लि. युनिट -२ (बाराशिव हनुमान ससाका) जि. हिंगोली	१४४.८७	१४४.८६	०.०१	०.०१

१८	पुणे	माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. माळेगाव (बु) शिवनगर, ता. बारामती, जि. पुणे	४७४.५६	४७४.५५	०.०१	०.०१
१९	पुणे	सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि. सोमेश्वर नगर, ता.बारामती, जि. पुणे	३९७.६४	३९७.६३	०.०१	०.०१
२०	पुणे	श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि., निवृत्तीनगर, पो- शिरोली बु., ता. जुन्नर, जि. पुणे	५९३.००	५९२.९९	०.०१	०.०१
२१	पुणे	रा.पवार घोडगंगा ससा्का लि., रावासाहेबनगर, ता. शिरुर, जि. पुणे	२९५.८७	२९५.८६	०.०१	०.०१
२२	पुणे	भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लि., पुणे	४२२.५९	४२२.५८	०.०१	०.०१
२३	सातारा	सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगर, ता. कराड, जि.सातारा	७००.६१	७००.६०	०.०१	०.०१
२४	सातारा	किसनवीर सहकारी साखर कारखाना लि. भुंईज ता. वाई जि. सातारा (आय.डी.बी. आय. बँक)	२३८.३८	१७९.२६	५९.१२	५९.१२
२५	सातारा	किसनवीर सहकारी साखर कारखाना लि. भुंईज ता. वाई जि. सातारा (बँक ऑफ इंडिया)	२०४.६०	१७१.०५	३३.५५	३३.५५
२६	सोलापूर	पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर	३३२.०७	३३२.०६	०.०१	०.०१
		राज्याची एकूण मागणी	**१०४५३.६६**	**१०३२९.७०**	**१०८.३०**	**१०८.३०**